महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे Rs.2/- कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ 25 एप्रिल 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 296 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024


## अलोकनाथ महाराज एक शक्तिपीठ..!

मानवी जीवन सुख दुःखाच्या राहाटगाडग्यात गुफलेली एक श्रृंखला आहे. सुख जसं अल्लाददायक असत,तस दुःख ही याच जीवनातील क्लेश, तापदायक भावना असते. सदैव भौतिक सुख आपल्यालाच लाभाव यासाठी भटकणारा, धडपडणारा प्रत्येक मानवी जीव आपल्या जीवनातील मुख्य हेतू, उद्देश यांना परखा होतं मूलभूत कर्म विसरत चालला आहे. याबाबत आजच्या युगात प्रत्येक मानवी जीवाला सदमार्गाच्या संस्कारांची नितांत निकडं भासते योग्य वेळी, सदगुरुचा कान मंत्र लाभने हे खऱ्या शिष्याचे भाग्य असते. सदगुरु रमनाथ महाराज संजीवनी समाधी मठाचे माठाधीपती गुरुवर्य अलोकनाथ महाराज यांच्या संस्कारक्षम मार्गदर्शनामुळे त्यांच्या भक्त परिवाराचा परीघ दिवसेंदिवस विस्तारत आहे. मित भाषी आध्यत्मिकतेचा गाढा अभ्यास यामुळे अलोकनाथ महाराज सर्वसामान्य माणसाला सुख दुःखात एक आधारवड, आपली भूमिका निभावताना दिसतात. संत, सदगुरुचे सकारात्मक विचार ही अलोकनाथ बाबा ची शिदोरीच, ही शिदोरी ते आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येक भक्ताला देत असतात, त्यांचा मायाळू स्वभाव, आणि सर्वकाही सदगुरु रमणनाथ महाराज ठीक ठाक करतील, घाबरू नकोस, मी सोबत आहे. हे पाठबल यामुळे अलोकनाथ महाराजांनी आपल्या मठाच्या विस्तारिकरणास मोठे योगदान दिले.धार्मिक स्थळ, त्याचे पावित्र्य जसे आवश्यक तसेच त्या धार्मिक स्थळास भेट देणाऱ्या प्रत्येकास आशेचा किरण ठरावा असा मोलाचा संदेश अलोकनाथ बाबा चा असतो. परिणामी परमपूज्य सद्गुरू रमणनाथ महाराजांच्या धार्मिक वारसा अखंड पणे चालवत त्याचा नवलोकिक वाढवत अलोकनाथ बाबा गेली अनेक वर्ष येथे काम करत आहे. प्रती गाणगापूर समजले जाणारे तानसा येथील हे धार्मिक स्थळ एक जागृत दत्ताचे स्थान देखील आहे. या स्थानाला प्रसिद्धीस तसेच त्याचे पवित्रता जोपासात सद्गुरू अलॉकनाथ महाराजांनी मठाधीपती म्हणून सुरु केलेले कार्य कौतुकास्पद आहे. शिक्षण, आरोग्य, सामाजिक बाधिलकी मानून या धार्मिक स्थळाचा कारभार सुरु आहे. मनुष्याच्या लोक कल्याण्याचा मार्ग, त्यासाठी ची त्याची कर्म गती कशी असावी यासाठीचे बाबांचे सद्गुरू विचारधारा एक आदर्शवत मार्ग पिठीका ठरते आहे. मुळात सुखाची व्याख्या प्रतके जीवमात्रा आपल्या सोयी नुसार करत असते. काळ बदलतोय काळानुरूप मानवी जीवनाचे कंगोरे बदलत आहेत. या बदलत्या काळान्वे सुख, समाधान, आणि मानवी जीवनाच्या भौतिक सुखाचा हव्यास बदलत आहे.

सुख कशात शोधायचे, समाधान कशात मानायचे याबाबत संस्कारक्षम आध्यात्मिक शिक्षण काळाची गरज बनली आहे. मानवी मन हे मानवाच्या विकासाच्या जडणं घडणीचा मुख्य केंद्रबिंदू आहे. मनावर ताबा मिळविण्यासाठी बाबाचे सदवीचार एक आदर्श मानवी विचाराची विचारधारा आहे.नव- नाथाच्या भक्ती रसाने पावन झालेली या भूमिला अलोकनाथ बाबानी कृतिशीलतेची जोड देत. धार्मिक प्रसार प्रचारा सोबत सेवेच्या व्रताची जोपासना सुरु केली आहे. गोसेवा, मानव सेवा, हे त्याचेच धोतक आहे. जो जे वांचील, ते ते तयासी लाभो ही त्यांची मानसिकता असते. त्यांच्या बाबत सांगायचं म्हंटल तर देव, देश आणि धर्मासाठी, झोकुनी घेतले स्वतःशी.!!मी पण गेले गेलोनी, अखंड सेवा हेच मम कर्म साजेशी !! प्रकट दिना निमित्ताने त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा!!

**श्री. रविंद्र घोडविंदे**
**(मुख्य संपादक)**

## महाराष्ट्रातील पाचशे पर्यटक राज्यात सुखरुप दाखल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**मुंबई, 24 एप्रिल**

- 184 प्रवाशांना घेऊन राज्य सरकारची दोन विशेष विमाने पोहोचली
- 232 प्रवाशांसाठी उद्या आणखी एक विशेष विमान
- मुख्यमंत्र्यांनी घेतला गिरीश महाजनांकडून आढावा, लष्करी रुग्णालयातील डॉक्टरांशी संवाद
- मंत्रालयात विशेष कक्ष, महाराष्ट्र सदनातूनही समन्वय


पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्देश दिल्यानंतर विविध प्रयत्नांतून गेल्या 2 दिवसात आतापर्यंत सुमारे 500 पर्यटक राज्यात परतले आहेत. राज्य सरकारने इंडिगो आणि एअर इंडिया अशी दोन विशेष विमाने पर्यटकांसाठी केली होती, त्यातून 184 पर्यटक मुंबईत दाखल झाले आहेत. दरम्यान, आणखी 232 प्रवाशांसाठी उद्या एका विशेष विमानाची व्यवस्था राज्य सरकार करीत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेनंतर आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांना तातडीने काश्मिरला जाण्यास सांगितले होते. गिरीश महाजन यांच्याकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज एकूणच स्थितीचा आढावा घेतला. उद्यासाठी आणखी विमाने करायची असतील, तर करा, त्याचा खर्च राज्य सरकार देईल, असे त्यांनी सांगितले. गिरीश महाजन यांनी लष्कराच्या रुग्णालयात उपचार घेत असलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांची भेट घेतली, तेव्हा देवेंद्र फडणवीस यांनी व्हीडिओ कॉलवर त्या पर्यटकांशी




संवाद साधला आणि उपचार करणाऱ्या तेथील डॉक्टरांचे आभारही मानले.

काश्मिरातील महाराष्ट्राच्या पर्यटकांना परत आणण्यासाठी मंत्रालय, मुख्यमंत्री कार्यालय आणि महाराष्ट्र सदनातील कक्ष अशी त्रिस्तरिय यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असून, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या विनंतीवर काम केले जात आहे. काही पर्यटकांची कालिका धाम, जम्मू येथे राहण्याची व्यवस्था केली गेली. अमरावती येथील सुमारे 14 पर्यटक येथे थांबले होते. काही पर्यटक मिळेल त्या व्यवस्थेने जम्मूवरुन दिल्लीकडे रवाना झाले असून, त्यांची दिल्ली येथे व्यवस्था करण्यात येत आहे. उद्या काश्मिरातून येणाऱ्या विशेष विमानात अकोला, अमरावती येथील पर्यटक असणार आहेत. दिल्लीत महाराष्ट्र सदनात प्रवाशांच्या याद्या सातत्याने तयार केल्या जात असून, गरज पडली तर परवाही विशेष विमान करण्याची तयारी राज्य सरकारतर्फे करण्यात येत आहे.

## गीतासार



### अध्याय ९
### राजविद्याराजगुह्ययोगः

यथाकाशस्थितो नित्यं वायुः सर्वत्रगो महान् । तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय ॥ ९-६ ॥

जसा आकाशापासून उत्पन्न होऊन सर्वत्र फिरणारा महान वायू नेहमी आकाशातच राहातो, त्याचप्रमाणे माझ्या संकल्पाने उत्पन्न झाल्यामुळे सर्व भूते माझ्यात राहातात, असे समज. ॥ ९-६ ॥

सर्वभूतानि कौन्तेय प्रकृतिं यान्ति मामिकाम् । कल्पक्षये पुनस्तानि कल्पादौ विसृजाम्यहम् ॥ ९-७ ॥

हे कौन्तेया (अर्थात कुंतीपुत्र अर्जुना), कल्पाच्या शेवटी सर्व भूते माझ्या प्रकृतीत विलीन होतात आणि कल्पाच्या आरंभी त्यांना मी पुन्हा उत्पन्न करतो. ॥ ९-७ ॥

प्रकृतिं स्वामवष्टभ्य विसृजामि पुनः पुनः । भूतग्राममिमं कृत्स्नमवशं प्रकृतेर्वशात् ॥ ९-८ ॥

आपल्या मायेचा अंगीकार करून प्रकृतीच्या ताब्यात असल्यामुळे पराधीन झालेल्या या सर्व भूतसमुदायाला मी वारंवार त्यांच्या कर्मानुसार उत्पन्न करतो. ॥ ९-८ ॥

न च मां तानि कर्माणि निबध्नन्ति धनञ्जय । उदासीनवदासीनमसक्तं तेषु कर्मसु ॥ ९-९ ॥

हे धनंजया (अर्थात अर्जुना), त्या कर्मांत आसक्ती नसलेल्या व उदासीनाप्रमाणे असलेल्या मज परमात्म्याला ती कर्मे बंधनाकारक होत नाहीत. ॥ ९-९ ॥

मयाध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् । हेतुनानेन कौन्तेय जगद्विपरिवर्तते ॥ ९-१० ॥

हे कौन्तेया (अर्थात कुंतीपुत्र अर्जुना), माझ्या अधिष्ठानामुळे प्रकृती चराचरासह सर्व जग निर्माण करते. याच कारणाने हे संसारचक्र फिरत आहे. ॥ ९-१० ॥

## आरोग्य
## गुणकारी चिंच



1 उन्हाळ्यात चिंचेचे पेय किंवा सरबत पिणे खूप फायदेशीर आहे. जर ते नियमितपणे सेवन केले तर उष्माघाताचा धोका राहत नाही आणि उष्णतेच्या इतर हानिकारक प्रभावांपासून संरक्षण करण्यास देखील ते उपयुक्त आहे.

2 आजकाल अपचनाची समस्या खूप सामान्य आहे. हे टाळण्यासाठी तुम्ही पिकलेली चिंच खाऊ शकता. यामुळे तुमच्या तोंडाची चव तर वाढेलच पण अपचनाची समस्याही दूर होईल.

3 भूक न लागणे किंवा पोटातील जंत असल्यास चिंचेचे सेवन करणे खूप फायदेशीर आहे. त्याचे सरबत किंवा पेय केवळ भूक वाढवत नाही तर पोटातील उष्णता कमी करते आणि थंडावा निर्माण करते. यामुळे पोटाच्या इतर कोणत्याही समस्या उद्भवत नाहीत.

6 पित्ताशी संबंधित समस्यांमध्ये चिंचेचे पाणी फायदेशीर आहे. यासाठी दररोज रात्री एका मातीच्या भांड्यात मनुका एवढी चिंच भिजवा. सकाळी मॅश करून गाळून घ्या. थोडे गोड पदार्थ घाला आणि रिकाम्या पोटी प्या.

१ आठवड्यात फायदे दिसून येतील.

7 उलट्या किंवा मळमळ झाल्यास चिंच खाणे किंवा त्याचे सरबत पिणे खूप फायदेशीर आहे. याशिवाय, तुम्ही चिंचेची साल जाळून त्याची भूकटी देखील खाऊ शकता.

8 टॉन्सिल्स किंवा खोकला असल्यास, चिंचेच्या बिया पाण्यात बारीक करून पातळ पेस्ट बनवा आणि ही पेस्ट तुमच्या टाळूवर लावा. असे केल्याने टॉन्सिल आणि खोकला दोन्हीसाठी फायदेशीर ठरेल.

9 चिंचेचे सेवन केल्याने तुमचा वाढलेला रक्तदाब कमी होण्यास फायदेशीर ठरू शकते. याशिवाय, तुमचे वजन कमी करण्यासाठी देखील हा एक उत्तम पर्याय आहे.

# जल बोगद्यामुळे हेटवणे धरणाची सुरक्षा धोक्यात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : नवी मुंबईत दिवसेंदिवस लोकवस्ती वाढत आहे,पर्यायाने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होत आहे,पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी सिडकोकडे हेटवणे धरणाशिवाय पर्याय नाही...शेतीसाठी पाण्याची मागणी नाही हे कारण पुढे करून पाण्याचा जास्तीत जास्त साठा पळविण्यात जल बोगदा ही नवीन पद्धत पुढे आणली आहे,त्यासाठी काम सुरू झाल्याचे समजते.

समजा सिडकोने असे काम सुरू केले आणि धरण निषिद्ध क्षेत्रात काम केल्यास ,धरण सुरक्षा शासन आदेश ८/४/२०१८ चे उल्लंघन होऊन हेटवणे धरणाच्या सुरक्षेस धोका निर्माण होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. यदा कदाचित धरण फुटले तर. या परिसरातील हजारो लोकांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो..कारण येथे पावसाचे प्रमाण मोठे आहेच.खरे पाहता उपविभागीय अधिकारी, तहसीलदार,जलसंपदा अधिकारी, याजकडे माहिती उपलब्ध असेलच.जर त्या माहितीबाबत हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग कामार्ली कोकण पाटबंधारे विभाग,अगर ठिकाणी उपलब्ध असेल तर ती मिळवून योग्य तो भविष्यातील धोका टाळण्यासाठी महसूल विभागाचे अधिकारी,जलसंपदा विभागाचे अधिकारी,पोलिस प्रशासन, सिडकोचे अधिकारी, आपत्ती व्यवस्थापनाचे अधिकारी यांची एकत्रित चौकशी स्थापन करून नक्की काय काम सुरू याची शहानिशा करून .भविष्यातील धरणाच्या सुरक्षेस धोका निर्माण होत असेल तर ते टाळण्याचा प्रयत्न करावा.हे धरण सिंचनासाठी पाणी देत नाही. पिण्यासाठी मुबलक पाणी देत नाही..मात्र सिडकोचे रोखीकरण हाच उद्देश ठेवलेला दिसतो.

स्वर्गीय भाई मोहन पाटील यांचे स्वप्न पूर्ण झालेले नाही कारण त्यांच्या मतदार संघात सिंचनाचे पाणी मिळाले नाही. त्यांची गावे विस्थापित झाली,जमिनी धरणासाठी दिल्या पण धरण उशाला आणि कोरड खारेपाट विभागाच्या घशाला अशी अवस्था कित्येक वर्ष आहे. हे एक मात्र प्रश्न पडतो की सिंचनाचे कालव्याचे काम सुरू होत नाही. मात्र हे बोगद्याचे काम जोरात सुरू असल्याचे समजते.धरणाचे पाणी पळवा,मात्र सिंचनाला पाणी देऊनच ,धरणाला धोका न होता.

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण शिबीर संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई व मुख्य मध्यस्थी केंद्र उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार तसेच प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीनिवास अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे यांच्यामार्फत बुधवार, दि.23 एप्रिल 2025 रोजी विधी सेवा सदन, ठाणे जिल्हा न्यायालय येथे मध्यस्थी जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात प्रमुख वक्ते म्हणून ठाणे कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश अमित आळंगे, ठाणे जिल्हा वकील संघटनेचे उपाध्यक्ष सलील भुटाला, ज्येष्ठ मध्यस्थी विधीज्ञ संजय म्हात्रे हे तर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव ईश्वर सुर्यवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम पार पडला. या शिबिरात ठाणे जिल्ह्यातील पॅनल विधीज्ञ, मध्यस्थी विधीज्ञ, लोकअभिरक्षक, विधी शाखेचे विद्यार्थी व इतर नागरिक उपस्थित होते

शिबिराची सुरुवात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव ईश्वर सुर्यवंशी यांनी प्रास्ताविक करून सुरुवात केली. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी मध्यस्थी प्रक्रियेचे स्वरूप, व्याप्ती स्पष्ट करून सांगितली तसेच मध्यस्थी प्रक्रियेमध्ये मध्यस्थी वकीलांची भुमिका काय असावी व मध्यस्थी प्रक्रिया किती कालावधीमध्ये पूर्ण करावी याबाबत मार्गदर्शन केले व मध्यस्थी प्रक्रियेच्या यशामध्ये विधीज्ञाची महत्वाची भुमिका असून विधीज्ञांनी मध्यस्थी प्रक्रियेसाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले.

यावेळी ठाणे कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश अमित आळंगे उपस्थितांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, आभासी (Online) पध्दतीने देखील मध्यस्थी करता येवू शकते. फक्त त्यासाठी दोन्ही पक्षकारांची संमती असावी लागते. तसेच एखाद्या भागामध्ये वादविवाद असल्यास तेथील समुदायांमध्ये सुध्दा मध्यस्थी घडवून आणता येवू शकते व त्यास सामुदायिक मध्यस्थी प्रक्रिया असे म्हटले जाते. मध्यस्थी प्रक्रियेमुळे पैसे व त्रास वाचतो, मध्यस्थी प्रक्रिया ही गोपनीय असते, मध्यस्थी प्रक्रियेमुळे जलदगतीने न्याय मिळतो, असे मध्यस्थीचे फायदे सांगून श्री.आळंगे यांनी मध्यस्थी प्रक्रियेचे महत्व पटवून दिले.

# वासिंदमध्ये गांवदेवीच्या उत्सवाला सुरुवात



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : गांवदेवी उत्सव समिती या समितीच्या वतीने आयोजित वासिंद गावाच्या गावदेवीच्या उत्सवाला आज शुक्रवार 25 एप्रिल रोजी सुरुवात होत आहे.

दरवर्षी प्रमाणे यंदाही येथील गावदेवी मातेचा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. आज शुक्रवार दि. 25 एप्रिल ते रविवार 27 एप्रिल 025 या तीन दिवशीय आयोजित या उत्सवात अभिषेक, पालखी सोहळा, जागर गोंधळ, महिलांसाठी हळदी कुंकू समारंभ, भजन व सुप्रसिद्ध नाथगायक आकाश शिंदे यांचा जागर गायनाचा कार्यक्रम पार पडणार आहे असे येथील गांवदेवी भक्त अमोल गोरले यांनी सांगितले.

तरीही या गावदेवी उत्सवात सर्व भाविक, भक्त व नागरीकांनी सहभाग घेऊन दर्शनाचा लाभ व या जत्रेचा आनंद घ्यावा असे आवाहन गावदेवी उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे तर पहिल्या दिवशी सायंकाळी चार ते रात्री एकदोन वाजता व पुढील दोन दिवस रात्री बारा वाजेपर्यंत हा उत्सव सुरू राहणार असून येथे कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांच फिरतं बंदोबस्त असणार असल्याचे गोरले यांनी म्हटले आहे.

# उल्हासनगरात प्लॅस्टिक माफियांना राजकीय वरदहस्त



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : देशातील अनेक राज्य सरकार सह महाराष्ट्रातही प्लास्टिक विक्रीवर कठोर बंदी घातली आहे. पण या आदेशाची अंमलबजावणी उल्हासनगरात केवळ कागदोपत्रीच होतांना दिसतेय. उल्हासनगर शहरातील बाजारपेठां मध्ये खुलेआम प्लास्टिक पिशव्या, बॅनर्स आणि प्लास्टिक साहित्य यांची राजरोस विक्री होतेय. महापालिका प्रशासन मात्र या काळ्या बाजाराकडे दुर्लक्ष करत असल्याचं चित्र दिसत आहे.

याप्रकरणी, आरोग्य विभागाची भुमिका निष्क्रिय ठरत असून, या अवैध धंद्याला शहरातील भाजपाच्या एका राजकीय पुढाऱ्याचा आश्रय लाभल्याने शहरावर प्रदूषणाचे संकट गडद झाले आहे. ही परिस्थिती पाहून पर्यावरण प्रेमी प्रचंड संताप व्यक्त करत आहेत. परंतु , आता आयुक्तांनी यात हस्तक्षेप करण्याची मागणी नागरिकांनी केलीय. शहरातील गजानन मार्केट, कैंप नं ४ मधील मार्केट, ५ नंबर गाऊन मार्केट यांसारख्या प्रमुख व्यावसायिक भागात प्लास्टिक पिशव्या आणि इतर वस्तूंची विक्री जोमात सुरू आहे.

केवळ स्थानिक व्यापारीच नाही तर कल्याण, कर्जत, कसारा आदी भागातील व्यापारी येथे प्लास्टिक पिशव्या खरेदीसाठी येतात. त्यामुळे उल्हासनगरमध्ये निर्माण होणाऱ्या कचऱ्यापैकी ५० टक्के कचरा प्लास्टिकचा आहे. प्लॅस्टिकमुळे नाले गटारी तुंबत असून निचरा होत नाही. हेच प्लास्टिक खाऊन जनावरे मरत आहेत. पर्यावरण विभाग आणि ग्रीन मार्शल देखील पूर्णपणे निष्क्रिय ठरले आहेत. शहरात महापालिका सामाजिक संस्थांच्या वतीने प्लास्टिक मुक्तीसाठी अनेक उमेदवार राबवल्या जातात. प्लास्टिकमुक्तीचे स्वप्न सत्यात बदलायचे असेल, तर ठोस आणि सातत्यपूर्ण कृतीतून 'प्लास्टिक माफियांवर कारवाई ची गरज आहे.

# वन कर्मचाऱ्यांच्या तत्परतेने वणवा आला आटोक्यात

## हजारो एकरवरील वन संपदा वाचवण्यात आले यश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : ठाणे जिल्ह्यातील शहापूर, मुरबाड, भिवंडी, अंबरनाथ या तालुक्यांतील डोंगर पट्ट्यात मोठ्या प्रमाणावर वणवे लागत आहेत. सततच्या वणव्यांमुळे सजीव सृष्टीची होरपळ होत आहेच शिवाय वनौषधी देखील होरपळतांना दिसत आहेत. दरम्यान शहापूर तालुक्यातील आटगांव राऊंड मधील जंगलात वणवा लागल्याची माहिती समजताच आटगाव वनपाल संदीप केदार, वनरक्षक संतोष खंदारे, चेतना खाडे,पल्लवी कोळी व इतर कर्मचाऱ्यांनी



भर उन्हात जीवाची पर्वा न करता वणवा विझवल्याने पर्यायाने शेकडो हेक्टर वनजमीनीवरील वन संपदा वाचवल्याने ते कौतुकास पात्र ठरले आहेत.

शहापूर उपवनसंरक्षक कार्यालयाअंतर्गत असलेल्या आटगाव राऊंड मध्ये १ हजार आठशे ते १ हजार ९५० हेक्टर वनजमीन समाविष्ट आहे. आटगाव राऊंड अंतर्गत असलेल्या वन क्षेत्रात वणवा मोठ्या प्रमाणात लागला होता.या वणव्याची माहिती वनपाल संदीप केदार यांना मिळताच ते आपल्या सहकार्यांसोबत घटनास्थळी दाखल होऊन सर्वांनी मोठ्या धैर्याने हा वनवणवा विझवून जंगल आगीपासून वाचवण्यात त्यांना यश मिळाले.या जंगलात औषधी वनस्पतीसह ऐन,धावडा, साग,मोह,टेंभुर्णी अशा विविध प्रकारची झाडे पहावयास मिळतात.तथापी या भागात मोठ्या प्रमाणात कंपन्या असून यांचा यांचा जमा केलेला कचरा तिथेच पेटवला जातो.पर्यायाने हवेमुळे जाळ उडून जंगलाला वनवा लागला जात असल्याचे अनेक प्रत्यक्षदर्शींनी बोलतांना सांगितले.

## केडीएमसीमध्ये
# वसुंधरा दिनानिमित्त स्वच्छता अभियान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : शासकीय मार्गदर्शक सूचनानुसार कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या वतीने वसुंधरा दिनाचे औचित्य साधून दिनांक २२ एप्रिल ते १ मे २०२५ या कालावधीत जागतिक वसुंधरा दिन सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या सप्ताहाच्या उद्घाटनाच्या निमित्ताने दुर्गाडी किल्ल्याजवळील गणेश घाट परिसरात विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात आले. "पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती घडविणे आणि नागरिकांमध्ये स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करणे, हा मुख्य उद्देश होता."

या उपक्रमात महापालिका आयुक्त अभिनव गोयल, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त



अतुल पाटील, माहिती व जनसंपर्क विभागाचे उपायुक्त संजय जाधव तसेच महापालिका सचिव किशोर शेळके यांचे सह महानगरपालिकेचे विविध अधिकारी व कर्मचारी, इंडियन मेडिकल असोसिएशनचे प्रतिनिधी, विविध सेवाभावी संस्था, एनजीओ आणि "मनुसृष्टी पर्यावरण सल्लागार" संस्थेच्या प्रतिनिधी उपस्थित होते. या मोहिमे दरम्यान खाडी किनाऱ्यावर साचलेला प्लास्टिक कचरा, प्लास्टिक बाटल्या, पिशव्या आणि इतर घाणीची साफसफाई करण्याचे अभियान राबवण्यात आले.

पर्यावरणाचे रक्षण करणे ही केवळ सरकारची नाही, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. आपला परिसर स्वच्छ ठेवणे, प्लास्टिकचा वापर टाळणे आणि निसर्गाशी सुसंवाद राखणे, हीच वसुंधरा दिनाच्या साजरीकरणाची खरी दिशा आहे. महानगरपालिका अशा उपक्रमांद्वारे सातत्याने नागरिकांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करत राहील असे आयुक्त अभिनव गोयल यांनी कर्यक्रमस्थळी सांगितले.

महानगरपालिकेच्या वतीने वसुंधरा दिन सप्ताहा अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, त्यामध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी स्लोगन स्पर्धा, शॉर्ट व्हिडिओ स्पर्धा , नागरिकांचे त्यांच्या प्रभागात पर्यावरण उत्तम राहण्यासाठी चे सूचीबद्ध कार्यक्रम प्रस्ताव संकल्पना सादरीकरण करणे अशा विविध स्पर्धांचा या उपक्रमांतर्गत समावेश आहे.

# डॉ.सुनील खर्डीकर यांना शक्तिमान भारत अवॉर्ड प्रदान




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : नेकझाद एंटरटेनमेंट आणि शिवम आर क्रिएशनच्या माध्यमातून मुंबईतील सहारा हॉटेलमध्ये नुकताच शक्तिमान भारत अवार्ड 2025 सन्मान सोहळा पार पडला. या निमित्ताने मुंबई सह देशभरातील कला, साहित्य, क्रीडा, राजकारण, समाजकारण, उद्योग आदी क्षेत्रात उंच भरारी घेणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. बॉलिवूडचे प्रसिद्ध खलनायक अभिनेते शक्ती कपूर यांच्या शुभहस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले.

डोंबिवलीतील ख्यातनाम व्यावसायिक तसेच नामांकित खर्डीकर क्लासेसचे संस्थापक डॉ.सुनील खर्डीकर यांचाही 'शक्तिमान भारत आवर्ड 2025' पुरस्काराने सन्मान करण्यात आला. बॉलिवूडमधील खलनायक अभिनेते शक्ती कपूर यांच्याच हस्ते पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात आले. त्याचबरोबर खर्डीकर यांचे निकटवर्तीय एड.गणेश मुकणे यांनाही शक्तिमान भारत अवार्ड 2025 ने गौरविण्यात आले. डॉ.सुनील खर्डीकर यांच्या हस्ते अन्य उपस्थितांना देखील पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

डॉ. सुनील खर्डीकर यांच्या शिक्षण क्षेत्रातील अविरत कार्यामुळे १०० हून अधिक सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक संस्थांनी त्यांना सन्मान चिन्ह देऊन गौरवले आहे. डॉ. खर्डीकर यांनी या पुरस्कारास सन्मान दर्शवताना आयोजक नेविल कावराना आणि शिवांगी परमार यांचे आभार मानले. "शिक्षण हा यशाकडे नेणारा महामार्ग आहे, आणि मी त्या मार्गावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारा एक छोटा मार्गदर्शक आहे." तसेच, "खर्डीकर क्लासेस शैक्षणिक क्षेत्रात अशीच उल्लेखनीय कार्ये करत राहतील" अश्या भावना त्यांनी व्यक्त केल्या. या कार्यक्रमात बिहार राज्यातील खासदार राजेश रांजन उर्फ पप्पू यादव, अनेक रीलस्टार, तसेच कलाकार उपस्थित होते.

# हल्ल्यात शहीद झालेल्या डोंबिवलीकरांच्या नातेवाईकांच्या संतप्त प्रतिक्रिया

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सरकारने अतिरेक्यांना कठोरातील कठोर शिक्षा द्यावी,धर्माच्या द्वेषाने बेछूट गोळीबार करून हत्या करणाऱ्या आतंकवाद्यांना पकडून शूट ऍट साईट ची ऑर्डर द्यावी तसेच भारताच्या बार्डरवरील मग त्या पाकिस्तान, बांगलादेशच्या बॉर्डर वरील अतिरेक्यांना पकडून त्यांनाही शूट ऍट साईट ची ऑर्डर द्यावी अशी मागणी सरकारकडे केली. जम्मू कश्मीर, पहलगाम मधील अतिरेकी हल्ल्यात शहीद झालेले हेमंत जोशी, संजय लेले व अतुल मोने यांच्या नातेवाईकांनी डोंबिवलीत गुरुवारी पत्रकार परिषद घेऊन आपल्या भावना व्यक्त केल्या.

काश्मीर मधील पहलगाम येथे फिरण्यासाठी गेलेल्या डोंबिवलीतील तीन कुटुंबियांच्या कर्त्या पुरुषावर दहशतवादी अतिरेक्यांनी केलेल्या बेछूट गोळीबाराची थरारक आखो देखी माहिती या हल्ल्यात बचावलेल्या तिन्ही कुटुंबातील सदस्य ध्रुव जोशी, हर्षल लेले, अनुष्का मोने व ऋचा मोने यांनी पत्रकार परिषदेत आपल्यावर घडलेल्या भयाण संकटाची माहिती दिली.



अतिरेकी हल्ला करताना तुम्ही हे काय करतायत? असे बोलणाऱ्या एका भारतीय नागरिकांना अतिरेक्यांनी गोळ्या झाडल्या. आम्ही सर्व जण खूप घाबरलो होतो.' तुमच्या पैकी कोणी हिंदू असाल तर त्यांनी हात वर करा' असे अतिरेकी म्हणाले. माझ्या वडिलांनी हाथ वर केला आम्ही त्यांना असा का करताय असे विचारले असता त्यांनी गोळीबार केला असता माझ्या हाताला काही तरी चाटून गेल्याचे जाणवलं. वडिलांच्या डोक्यात गोळी लागल्याचे त्याच्या डोक्यातून रक्त वाहू लागल्याचे दिसून आल्याचे हर्षल लेले याने सांगितले.

अतिरेकी हे कसे दिसत होते हे पत्रकारांनी विचारले असता नातेवाईक म्हणाले, पिक्चर मध्ये पाहिलं तसे ते अतिरेकी दिसत होते. तोंडावर मास्क लावून अतिरेकी आम्हाला विचारत होते. त्या अतिरेक्यांच्या डोक्यावर कॅमेरे लावले होते. काही वेळाने आम्ही खाली आल्यावर स्थानिकांनी मदत केली. पत्रकार परिषदेत हर्षद याने सरकारकडे मागणी केली आहे की धर्माच्या द्वेषाने बेछूट गोळीबार करून हत्या करणाऱ्या आतंकवाद्यांना पकडून शूट ऍट साईट ऑर्डर द्यावी अशी मागणी केली.

तर अनुष्का मोने यांनी घडलेल्या दुखद घडण्याची माहिती देताना सांगितले की, एकदीड च्या सुमारास आम्ही पेहलगामला पोहचलो. सगळे आनंदी होतो, फोटो काढले खाण्या साठी पाणी पिण्यासाठी स्टॉल आजू बाजूला असल्याने त्या स्टॉल वर खाण्यासाठी गेलो होतो. खाऊन झाल्यावर थोडासा शूटिंग चा आवाज आला पण आम्हाला वाटले पर्यटन स्थळा असल्याने गेमस वगैरे असतील म्हणून लक्ष दिले नाही. नंतर फायरिंग सुरू झाल्याने हल्ला गुल्ला होऊन गोंधळ उडाला सगळेच घाबरले व सगळे आम्ही खाली झुकलो.

त्या नंतर ते आम्हाला विचारायला लागले तुमच्यात हिदू कोण व मुसलमान कोण तरीही कोणीही रिप्लाय दिला नाही वेग वेगळे झालो होतो पण तरीही आमच्यातील एकजण होते ते पुढे बोललेले की का अस करता आम्ही काय केले आहे असं बोलायला गेले असता त्यांनी त्यांना शूट केले. माझे मिस्टर बोलले गोळ्या घालू नका आम्ही काय नाय करत आम्ही बसतो इथे तर त्यांनाही शूट केले. परत त्यांनी विचारलं हिदू कोण आहे म्हणून तर आमच्या जीजूने हाथ वर केला तर त्यांना ही शूट केले आमच्या समोर आमच्या तिन्ही फॅमिलीला त्यांनी शूट केले. आमच्या घरातील कर्त पुरुष होते ते. असे बऱ्याच जणांना त्यांना तिथे मारले .आम्ही काहीच करू शकलो नाही त्यांना . नंतर ती लोक गेल्यावर आम्ही त्यांना हलवण्याचा उठवण्याचा खूप प्रयत्न केला पण आम्हाला काहीच करता आले नाही . तिथेली लोक बोलायला लागली की तुम्ही तुमचा जीव वाचवून निघून जा.त्याच दरम्यान आतंकवादी बोलत होते की आप लोगोन यहा पे आतंक मचा के रखा है. त्यामुळे गव्हरमेटने याच्यावर ऍक्शन घेऊन आम्हाला न्याय मिळवून दिला पाहिजे.आणि त्या लोकांवर ऍक्शन घ्यायला पाहिजे अशी सरकार कडे पत्रकार परिषदेद्वारे मागणी केली.


जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A. | B.Com. | B.Sc. CHEMISTRY | B.Sc. MATHS | BAF | BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY | M.A. MARATHI | M.A. ECONOMICS | M.A. SOCIOLOGY | M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7719814142
9130580111

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# अपीलकर्त्याच्या गैरवर्तणुकीमुळे तीन वर्षे सुनावणीस बंदी

## – राज्य माहिती आयुक्तांचे आदेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई, दि. 23: माहिती अधिकारांतर्गत मोठ्या संख्येने द्वितीय अपील दाखल केल्यावर ते गांभीर्याने न घेता माहिती अधिकाराचा दुरुपयोग आणि राज्य माहिती आयोगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याने श्री. केतन रसिकलाल मेहता आणि श्री. किरण ए. के. यांच्या द्वितीय अपिले आणि तक्रार अर्जांची सुनावणी पुढील तीन वर्षांपर्यंत घेण्यात येणार नाही, असे आदेश राज्य माहिती आयोगाच्या कोकण खंडपीठाचे राज्य माहिती आयुक्त शेखर चन्ने यांनी दिले आहेत.

श्री. मेहता आणि श्री. करण ए. के. यांनी मीरा- भाईंदर महानगरपालिकेच्या जनमाहिती अधिकाऱ्याकडे माहिती अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत अर्ज केला होता. जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने दोघांनी प्रथम अपील दाखल केले होते. त्यावर मीरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे सुनावणी झाली. प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने त्याबाबतचे आदेश निर्गमित केले आले होते.

प्रथम अपिलीय अधिकाऱ्याच्या निर्णयामुळेदेखील समाधान न झाल्याने श्री. मेहता आणि श्री. किरण दोघांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले होते; परंतु त्यानंतर आपल्याला माहिती प्राप्त झाल्याचेही दोघांनी राज्य माहिती आयोगाला कळविल होते. त्यांच्या दोघांच्याही विधानांत विसंगती आढळून आली. त्यामुळे दोघांच्या अपिलांवर दोन वेळा सुनावणी ठेवण्यात आली होती. पहिल्या वेळी श्री. किरण अनुपस्थित होते; दुसऱ्यांदा ऑनलाईन पद्धतीने उपस्थित होते. श्री. मेहता मात्र दोन्ही वेळा अनुपस्थित होते. इतर प्रकरणांतही दोघांनी मोठ्याप्रमाणावर द्वितीय अपील दाखल केले आहेत; परंतु त्यावरील सुनावणीबाबत दोघांमध्ये गांभीर्य दिसून येत नाही; तसेच त्यांनी माहिती अधिकारांचा गैरवापर केल्याचे स्पष्ट होते, असे राज्य माहिती आयोगाचे मत झाल्याने हा आदेश देण्यात आला आहे.

> **कायद्याच्या गैरवापरास प्रतिबंधमाहिती अधिकाराचा गांभीर्यपूर्वक वापर करणारे प्रामाणिक अर्जदार आणि अपिलार्थींना वेळेवर न्याय मिळणे आवश्यक आहे. त्याचबरोबर द्वितीय अपिलांची मोठी संख्या लक्षात घेता अशा पद्धतीने माहिती अधिकाराचा दुरुपयोग करणाऱ्यांना प्रतिबंध करणे आवश्यक आहे.**
> **- शेखर चन्ने,**
> **राज्य माहिती आयुक्त, कोकण खंडपीठ**

# ठाणे मनपाच्या मालकीच्या व्यावसायिक इमारतीत अनधिकृत बांधकाम

## नागरिकांचा जीव धोक्यात

### ओसी, अंतिम फायर एन.ओ.सी शिवाय इमारतीचा वापर



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे,24.एप्रिल :** गावदेवी मार्केट (गावदेवी भाजी मंडई ) ही व्यवसायिक इमारत ठाणे महानगरपालिके कडून 2014 साली बांधण्यात आली. शहराच्या मध्यवर्ती भागात वर्दळीच्या ठिकाणी असलेल्या या इमारतीच्या बेसमेंटला दुचाकी वाहनांची पार्किंग तळमजल्यावर भाजी मंडईसह (भाजीपाला दुकाने) इतर व्यावसायिक गाळे व वरील मजल्यावर ठाणे महानगरपालिकेचे नौपाडा कोपरी प्रभाग समिती कार्यालय, तसेच दुय्यम निबंधक कार्यालय व इतर कार्यालये असल्याने दररोज हजारो लोकांची ये जा या ठिकाणी असते. परंतु या इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र अर्थात ओसीच (ओक्युपेशन सर्टिफिकेट) नाही. ओसी असल्याशिवाय बिल्डर वा मालक कुणालाही इमारतीचा-घराचा ताबा देऊ शकत नाही. असे झाल्यास हा गुन्हा मानला जातो असे असतानाही ठाणे महापालिका स्वतःच्या मालकीच्या ओसी नसलेल्या इमारतीचा व्यावसायिक वापर मागील दहा वर्षापासून सर्रासपणे करत आहे.

नियमाप्रमाणे ओसी असल्याशिवाय कोणालाही फायर एनओसी देता येत नाही.परंतु या इमारतीचे बांधकाम झाल्यानंतर प्रार्थमिक फायर एनओसी देताना अग्निशमन विभागाकडून अस्तित्वात असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार या इमारतीस स्वतंत्र नियंत्रण कक्ष पुरवणे बंधनकारक असल्याचे तसेच स्थायी अग्निशमन व प्रतिबंधात्मक यंत्रणा कार्यान्वित असले बाबतचा अहवाल वर्षातून दोनदा अग्निशमन विभागास सादर करणे बंधनकारक असल्याचे सांगितले होते.परंतु मागील दहा वर्षात असा कुठल्याही प्रकारचा अहवाल सादर करण्यात आलेला नाही व सद्यस्थितीत या इमारतीची अग्निशमन यंत्रणाच योग्य प्रकारे कार्यान्वित नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

या इमारतीतील तळ मजल्यावरील गाळे पुनर्वसन स्वरूपात भाजी मंडई साठी दिलेले आहेत.परंतु भाजीविक्री न करता मोठ्या प्रमाणात येथील गाळयांच्या वापर कपड्यांच्या दुकानांसाठी केला जात आहे. तसेच या इमारतीमध्ये मंजूर नकाशा व्यतिरिक्त आत येण्याचा मार्ग, बाहेर जाण्याचा मार्गातील पूर्वेकडील जिन्यावर उत्तरेकडील रॅम्पवर अनधिकृत बांधकाम केल्याचे शहर विकास विभागाच्या पाहणी अहवालातून निदर्शनात आले असल्याने तसेच तळमजल्यावर मोठ्या प्रमाणात कपड्याची दुकाने असल्याने आग लागण्याची घटना घडल्यास बाहेर पडताना चेंगराचेंगरी होऊन मोठी दुर्घटना अथवा जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.या ठिकाणचे अनधिकृत बांधकाम शहर विकास विभागाची पूर्व परवानगी न घेता स्थावर मालमत्ता विभागाने पुनर्वसन स्वरूपात दिले असल्यास एक प्रकारे गाळेधारकांची देखील केलेली फसवणूक आहे.

त्यामुळे या पद्धतीने महानगरपालिकाच आत बाहेर येण्याच्या जिन्याच्या मार्गात अनधिकृत बांधकाम करून पुनर्वसन कसे काय करू शकते असा सवाल ठाणे काँग्रेसचे प्रवक्ते राहुल पिंगळे यांनी उपस्थित करत या सर्व प्रकरणाची चौकशी करून जे कोणी दोषी अधिकारी असतील त्यांच्यावर कडक कारवाईची मागणी पालिका आयुक्त सौरभ राव यांची भेट घेत केलेली आहे.


**मुरबाड नगरपंचायत, मुरबाड**
**मु.पो. ता. मुरबाड, जि. ठाणे - ४२१ ४०१**
फोन नं. ०२५२४-२२५१०५ ई मेल - mnpmurbad@gmail.com

**ई- निविदा सुचना क्र. सन २०२५-२६**

मुरबाड नगरपंचायत, मुरबाड ता.मुरबाड, जि. ठाणे. बांधकाम विभागाच्या "स्वच्छ सर्वेक्षण २०२० (स्वच्छ भारत अभियान) अंतर्गत प्रोत्साहनात्मक अनुदान सन २०२२-२३ या योजनेंतर्गत ०१ सामुदायिक शौचालयाचे कामांची ई-निविदा नगरपंचायत मुरबाड कडून मागविण्यात येत आहे. कामा संबंधी सविस्तर तपशील mahatenders.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

तरी सदर निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार निम्मस्वक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे

सही /-
(मनोज ज. म्हसे)
मुख्याधिकारी नगर पंचायत मुरबाड

जावक क्रमांक : मुनप/बांधकाम विभाग/६२८/२०२५
दि.२४/०४/२०२५


# पाकविरोधात भारताची कठोर कारवाई

## अटारी चेकपोस्ट बंद ■ सिंधू कराराला स्थगिती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**नवी दिल्ली :** पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सुरक्षाविषयक कॅबिनेट समितीच्या बैठकीत पाकिस्तानवर कायदेशीर स्ट्राइक करण्यासाठी पाच मोठे निर्णय घेण्यात आले आहेत.

भारताने कडक पावले उचलत बैठकीत पाच प्रमुख निर्णय घेतले आहेत. या हल्ल्यानंतर भारताने हल्लेखोरांना पाकिस्तानच्या असलेल्या थेट पाठिंब्यावरून प्रहार केला. भारताने या हल्ल्यानंतर पाकिस्तानवर थेट आरोप केला असून पाकिस्तानी दूतावास बंद करण्यास सांगितले आहे आणि पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द करण्यात आले आहेत. पाकिस्तानी नागरिकांना भारतीय व्हिसा बंद करण्यात आला असून एका आठवड्यामध्ये भारतातील पाकिस्तानच्या राजकीय अधिकाऱ्यांनी देश सोडावा, असा आदेशही देण्यात आला आहे. भारतातील पाकिस्तानी उच्च आयोग बंद करण्यात आला असून अधिकाऱ्यांना पाकिस्तानात माघारी जाण्याचे आदेश दिले आहेत. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री म्हणाले की, सीसीएस निर्णयात सिंधू पाणी कराराला स्थगिती देण्यात आली आहे. तसेच अटारी बॉर्डर चेकपोस्ट बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सार्कअंतर्गत पाकिस्तानी नागरिकांना देण्यात येणारी व्हिसा सूट रद्द करण्यात आली आहे आणि त्याअंतर्गत, भारतात राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांच्या आत भारत सोडण्यास सांगण्यात आले आहे. भारतातील सर्व पाकिस्तानी लष्करी सल्लागारांनाही एका आठवड्याच्या आत भारत सोडण्यास सांगण्यात आले आहे. भारताने इस्लामाबादमधून सल्लागारांनाही परत बोलावले आहे. उच्चायुक्तालयांची एकूण संख्या ३० पर्यंत कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# समृद्धी बाधित शेतकऱ्यांचा महाराष्ट्र दिनी आमरण उपोषणाचा इशारा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मागील सन २०१७ ते २०२५ पर्यंत समृध्दी महामार्ग शहापूर तालुक्यातील अंदाड येथील भूसंपादीत झालेल्या सात शेतक-यांना आजपर्यंत मोबदला मिळालेला नसल्यामुळे त्यांनी १ मे रोजी समृद्धी महामार्गांवर बसून आमरण उपोषणाचा इशारा तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

स्व. बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गसाठी शेतकरी गुलाब मंगल भोईर, बेबीबाई दत्तु पवार, सविता काशिनाथ भडांगे, पुनम पंढरीनाथ मोगरे, जयराम नाथा गडगे, यशवंत सिताराम पंडित, निराबाई चिमन भेरे यांच्या जमिनी बाधित झाल्या असून त्यांना मागील सात वर्षापासून समृध्दी बाधित जमिनीचा मोबदला मिळालेला नाही.याबाबत तहसिल कार्यालय शहापूर, भिवंडी उपविभागीय अधिकारी तसेच जिल्हाधिकारी ठाणे यांचेशी संपर्क करुन त्यांच्या नावावर असणाऱ्या जमिनी सरकारी करुन आम्हाला मोबदला दिला नसल्याचा आरोप शेताकऱ्यांनी केला आहे.तथापी यासंदर्भात राज्यपाल यांचे पत्र देखील आले असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.वारंवार पाठपुरावा करूनही कोणत्याही शेतकऱ्यांना मोबदला मिळाला नसल्याचे निवेदनात म्हटले आहे.दरम्यान मागील ४ वर्षात २ शेतकऱ्यांचा मोबदला प्रतिक्षेत व जमिन संपादित झाल्याने मानसिक धक्क्याने मृत्यु झाला असून उर्वरित शेतकरी समृध्दी महामार्ग येथे आमरण उपोषण करणार आहेत.

> **शेतकऱ्यांशी माझं बोलणं झालं आहे.ते उपोषण करणार नाहीत.**
> **- परमेश्वर कासुले, तहसीलदार शहापूर.**
> ————————
> **२०१७ पासून आम्ही जमिनीच्या मोबदल्यासाठी पाठपुरावा करत आहोत.आता समृद्धी महामार्ग सुरु होत आला तरी अजूनही आम्हाला दाद मिळाली नाही.आम्ही मेल्यानंतर आम्हाला जमिनीची मोबदला देणार का.आम्ही आमरण उपोषणच्या निर्णयावर ठाम आहोत.**
> **- गुलाब मंगल भोईर, समृद्धी महामार्ग बाधित शेतकरी.**

# संच मान्यतेचे सुधारित नियम कायम ठेवा

## शिक्षण क्रांती संघटनेची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** शासन निर्णयाद्वारे नवीन शाळा सुरु करणे, वर्ग जोडणे त्यानुषंगाने शाळांमधील संरचनात्मक बदल करणे आणि संच मान्यतेचे सुधारित निकष विहित करण्यात आले आहेत.दरम्यान संच मान्यतेच्या नवीन निकषांनुसार राज्यातील इंग्रजी माध्यम वगळता अन्य माध्यमांच्या अनेक शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत.अनेक शिक्षक अतिरिक्त होणार असून त्यांच्या समायोजनाचा मोठा प्रश्न निर्माण होणार असल्याने संच मान्यतेचे सुधारित नियम रद्द करुन प्रचलित नियम कायम करावे अशी मागणी शिक्षण क्रांती संघटनेचे अध्यक्ष सुधीर घागस यांनी शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्याकडे केली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० राज्यात व संपूर्ण देशात लागू होणार आहे.एकीकडे या धोरणामध्ये मातृभाषेतील शिक्षणाला महत्व देण्यात आले आहे.तर दुसरीकडे मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या शाळा बंद पडत आहेत. शहरी भागातच नव्हे तर खेडोपाडीही इंग्रजी माध्यमाच्या शाळा जाऊन पोहोचल्या आहेत. त्यामुळे मराठी तसेच अन्य प्रादेशिक भाषा माध्यमाच्या शाळांमध्ये पालक आपल्या मुलांना शिकवण्यास उदासीन आहेत असे निवेदनात म्हटले आहे.तथापी इंग्रजी माध्यम वगळता अन्य माध्यमांच्या अनुदानित शाळांमध्ये शिक्षकांची हजारो पदे रिक्त आहेत. या शाळांमध्ये भौतिक सुविधांचाही अभाव दिसून येतो या व तत्सम कारणांमुळे पालक विद्यार्थ्यांना अनुदानित शाळांमध्ये घालत नाहीत.त्यामुळे राज्यातील आदिवासी, गोर-गरीब व दुर्गम भागातील मुले प्रभावी शिक्षणापासून वंचित राहण्याची भीती शिक्षण क्रांती संघटनेने व्यक्त केली आहे.किंबहुना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ चा दाखला देत शासनाने विद्यार्थी हिताविरोधात अनेक निर्णय घेतले आहेत. १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय हा देखील असाच एक निर्णय आहे. मुख्याध्यापक व शिक्षक पदे कमी करणे, शिपाई भरती बंद करणे यामुळे देखील अनुदानित शाळांवर विपरीत परिणाम होणार आहे.शालेय कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्च कमी करण्यासाठी असे शिक्षण हिताविरोधातील निर्णय सर्वच सरकारांनी घेतल्याचा नमोल्लेख करण्यात आला आहे..

> **खेडोपाडीच नव्हे तर शहरी भागातीलही अनुदानित शाळांमधील शिक्षक जिथे गोर गरिबांची मुले शिक्षण घेत आहेत, ज्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळांची फी परवडू शकत नाही अशी मुले शोधत फिरत आहेत. गोर गरिबांच्या शिक्षणाची जबाबदारी शासनाने स्वीकारलेली आहे. असे असतांना स्वयंअर्थसहाय्यित शाळांचे विधेयक लागू करून शासनाने व प्रशासकीय सेवेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अनुदानित शाळा बंद पाडण्याचा घाट घातला आहे.**
> **- सुधीर घागस, अध्यक्ष शिक्षण क्रांती संघटना महाराष्ट्र राज्य.**

# कल्याणात बौद्ध वधू वर मेळाव्याचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण-** विवाह जुळणे हि आज भीषण समस्या निर्माण झाली असून एकाच छताखाली स्थळे मिळून वेळ आणि मोठ्या संख्येने पैसा वाचावा ह्या उद्देशाने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने बौद्ध वधू वर परिचय मेळाव्याचे रविवार २७ एप्रिल रोजी कल्याण येथे आयोजन करण्यात आले आहे.

कल्याणातील महापालिके समोरील शंकरराव चौक येथील स्वामी नारायण हॉल येथे सकाळी १० ते २ ह्या वेळेत बौद्ध वधू वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. ज्येष्ठ साहित्यिक शुक्राचार्य गायकवाड हे बौद्ध वधू वर परिचय मेळाव्याचे उद्घाटन करणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या ज्योती जाधव उपस्थित राहणार आहेत. ॲड. रोहन गायकवाड उपस्थितांना कायदेविषयक मार्गदर्शन करणार असून प्रमुख पाहुणे म्हणून सर्वश्री ॲड. प्रकाश जगताप, रविंद्र गुरचळ , केतन रोकडे , मिलिंद गायकवाड, समाधान मोरे, अरुण भालेराव, रमेश बर्वे , मनोज जाधव, रमेश जाधव, सचिन भालेराव, अनिल इंगळे, भूषण कोकणे, वैशाली वाघ, नेहा रामराजे, कांचन केदारे, योगिता पवार, छाया वाघमारे, उर्मिला भालेराव, कल्पना खरात, कमल भडांगे , अनिता शिंदे, सुवर्णा गायकवाड, सिंधू मेश्राम, भारती जाधव, गणिता आठवले, सुषमा गायकवाड, सुषमा अहिरे, दिपा गांगुर्डे इत्यादी मान्यवर तर विशेष अतिथी म्हणून सुप्रसिद्ध वैद्यकीय तज्ञ डॉ. संजीव कांबळे, श्रद्धा केदार, रूपाली वानखेडे, सुप्रसिद्ध पत्रकार सिद्धार्थ गायकवाड, सिद्धार्थ वाघमारे , राजू काऊतकर, सुप्रसिद्ध कर्मचारी नेते शशीकांत पवार उपस्थित राहणार आहेत. अधिक माहितीसाठी अनिल काकडे 9324552963, 8104211818 ह्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे






# भिवंडी पालिका क्षेत्रातील संघटना असोसिएशन आणि आस्थापनांची बैठक



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** मुख्यमंत्र्यांच्या शंभर दिवसांसाठी सात कलमी कृती आराखडा अंतर्गत मा. प्रशासक तथा आयुक्त सो., श्री अनमोल सागर (भा.प्र.से) यांच्या अध्यक्षतेखाली बोलवण्यात आली होती.

संदर्भीय घटका अंतर्गत दिनांक १७/०४/२०२५ रोजी लॉजिस्टिक असोसिएशन सदस्यांसाठी विशेष बैठकीचे आयोजन मा. प्रशासक तथा आयुक्त सो.. यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली. सदर बैठकीस शहरातील एकूण १६ सदस्य यांनी आपली उपस्थिती दर्शवली. बैठकी दरम्यान मा. प्रशासक तथा आयुक्त सो., यांनी सर्व सदस्यांना आवाहन केले की, भिवंडी हे लॉजिस्टिक हैंव असून त्याची ओळख जागतिक पातळीवर होण्यासाठी अजून आपल्याला त्याच्यात काय सुधारणा करता येतील याबाबतीत असोसिएशनच्या लेटर हेडवर लिखित स्वरूपात सूचना करण्याचे आवाहन करण्यात आले व विविध मुद्यांवर चर्चा करण्यात आली.

# आपत्कालीन परिस्थितीशी सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज

## -पालकमंत्री गणेश नाईक यांची माहिती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

आगामी मान्सून काळात संभाव्य आपत्तींचा सामना करण्यासाठी आवश्यक ती तयारी सुरू असून आपत्कालीन परिस्थितीशी सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज असल्याचे प्रतिपादन वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार गणेश नाईक यांनी केले.

मान्सूनपूर्व आढावा बैठकीचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे करण्यात आले यावेळी पालकमंत्री श्री .नाईक बोलत होते.

या बैठकीस खासदार डॉ.हेमंत सावरा, आमदार स्नेहा दुबे, आमदार राजन नाईक, आमदार हरिश्चंद्र भोये, जिल्हाधिकारी डॉ.इंदूराणी जाखड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, वसई विरार महानगरपालिकेचे आयुक्त अनिल पवार, सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी अपूर्वा बासुर, श्री.खत्री, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी विवेकानंद कदम तसेच आपत्ती व्यवस्थापन विभाग, महापालिका, आरोग्य, जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम, महावितरण, रेल्वे, पोलीस व इतर संबंधित यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पावसाळयामध्ये धरणाचे पाणी नदीच्या पात्रात सोडण्यापूर्वी नदी काठावरील गावामध्ये दवंडी देऊन गावकऱ्यांना सतर्क राहण्याचे आवाहन ग्रामपंचायत स्तरावरून करावे. तसेच पावसाळयामध्ये रेल्वे वाहतूक सुरळीत सुरू राहण्यासाठी रेल्वे विभागाने पावसाळयापूर्वी ज्या ठिकाणी पाणी जमा होते. अशा ठिकाणी भराव टाकावा. रेल्वे सेवेमध्ये कोणताही अडथळा येणार नाही याची दक्षता घ्यावी असे निर्देश पालकमंत्री गणेश नाईक यांनी दिले.

वादळी वाऱ्यांचा इशारा हवामान विभागाने दिल्यावर मत्स्य व्यवसाय विभागाने तात्काळ मच्छीमारांना समुद्रात जाण्यापासून रोखावे जे मच्छीमार समुद्रात गेले असतील त्यांना सुरक्षित किनाऱ्यावर आणण्यासाठी उपाययोजना कराव्यात तसेच पावसाळयात एखादी परिस्थिती उद्भवली असता नजीकच्या शाळेत स्थानिकांची राहण्याची सोय करता येण्यासाठी ज्या शाळा सुस्थितीत नसतील पावसाळयापूर्वी अशा शाळा दुरुस्त करून घ्याव्यात तसेच डहाणू आणि जव्हार येथील प्रकल्प अधिकारी यांनी आश्रम शाळा सुस्थितीत आहेत का याची पाहणी करून त्या सुस्थितीत कराव्यात असे निर्देश पालकमंत्री गणेश नाईक यांनी दिले.

## खेलो इंडियासाठी गतका महाराष्ट्राचा संघ सज्ज

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सातवी खेलो इंडिया युथ गेम्स 2025 बिहार येथे 4 मे ते 15 मे दरम्यान होणार आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या पाच मुले व सहा मुलींची निवड झाली आहे. साई चौधरी ठाणे जिल्हा, मेघराज नलावडे सातारा जिल्हा, ओम चौधरी, श्रवण सटाले, स्पंदन ताकवले पुणे जिल्हा, श्रमिका पाटील, तन्मयी पाटील, मालविका सुदैवण रायगड जिल्हा, कीर्ती कांबळे पुणे जिल्हा, भाग्यश्री बनगर पिंपरी चिंचवड महानगरपालिका, सेजल गालींदे पुणे महानगरपालिका यांचा समावेश असून असोसिएशन ऑफ गतका, महाराष्ट्राचे अध्यक्ष संतोष चौधरी व सचिव प्रा. आरती चौधरी यांनी मुलांना शुभेच्छा स्वरूप किटबॅक गिफ्ट करून मुलांचे प्रोत्साहन वाढवले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेकरिता महाराष्ट्र खेलो इंडिया संघाचे प्रशिक्षक पदी प्रा. आरती चौधरी (आंतरराष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षण) आणि मंथन पवार (राष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षक) यांची निवड करण्यात आलेली आहे. क्रीडा व युवक सेवा संचालक महाराष्ट्र राज्य यांनी 26 एप्रिल ते 3 मे पर्यंत बालेवाडी येथे सराव शिबिराचे आयोजन केलेले आहे. हे खेळाडू गतका खेळातील फरिसोटी टीम, फरिसोटी इंडिविज्युअल, सिंगल सोटी इंडिविज्युअल या क्रीडा प्रकारांमध्ये सहभाग घेतील.



# प.पू. गुरुवर्य अलोकनाथ महाराज प्रकट दिन सोहळा

शुक्रवार : दि. २५/०४/२०२५

ठिकाण : नाथपंथी प.पू. रमणनाथ महाराज समाधीस्थान तानसा ता. शहापूर, जि. ठाणे वेळ सायं. ५ नंतर



## स्थान महात्म्य

श्री दत्तभक्त नवनाथ पंथी प.पू. रमणनाथ महाराज यांची संजिवन समाधी सन १७३५ ची आहे. प.पू. रमणनाथ महाराज ई.स. १६०० शतकात या ठिकाणी श्री शैलम येथून आले. प्रभू दत्तगुरूंच्या दर्शन प्राप्तीसाठी या स्थानावर ११० वर्षे तपसाधना केली. प्रभू दत्त भगवान यांनी त्यांना प्रत्यक्ष दर्शन देवून अनुग्रह दिला. विश्वकल्याणार्थ भूतलावर श्रीदत्त प्रभूनी २४ अनुयायी तयार केले. त्यात श्री. रमणनाथ महाराज १७ वे अनुयायी होते. जनहितार्थ मार्गदर्शन करणे, दुःखी जनांचे दुःख दूर करून आनंदमय जीवन प्राप्त करून देणे. दत्तसंप्रदयाची अध्यात्मिक माहिती देवून प्रचार व प्रसार करणे असे विधायक कार्य श्री दत्तप्रभुंच्या आदेशाने प.पू. रमणनाथ महाराजांनी केले. पुढे भगवान दत्तात्रेय यांच्याच आदेशाने त्रिपुरारी पौर्णिमेस सन १७३५ मध्ये येथे संजीवन समाधी घेतली. अशा महात्म्यांनी समाधी घेतल्यानंतरही त्यांचे अस्तित्व कायम ठेवलेले असते. भक्तांना त्यांच्या श्रध्दाभक्तीनुसार दर्शन लाभ मिळतो. भक्तजनांचे पाठीशी त्यांचे आशिर्वाद कायम असतात. प्रभू भगवान दत्तात्रेयाचे या स्थानाचे प्रथम प्रचारक तथा सेवक प.पू. रमणनाय महाराजच होते असे स्पष्ट दिसून येते.

समाधीनंतर बराच कालावधी गेला. सभोवताली विशाल वृक्षांनी जागा व्यापली. काही काळ हे स्थान दुर्लक्षित झाले. जवळच काही वर्षांनी तानसा धरणाचे काम सुरू झाले होते. धरणासाठी रेती पुरवठा करणेचे काम त्यावेळी भागवत नावाचे व्यक्तीकडे होते. ते दुपारी किंवा अन्य वेळी विश्रांतीसाठी मोठ्या झाडांच्या सावलीचा आश्रय घेत असत. जागा साफ करून विश्रांती घेत असत. असेच एक दिवस समाधीजवळ आले. बांधलेला ओटा समजून तेथे विश्रांती केली तेथेच समाधीतून त्यांना दृष्टान्त दिला. अरे मी येथे रमणनाथ महाराज आहे. सभावतालची जागा साफ कर, दिवाबत्ती सुरू कर आणि भागवतबाबांना दृष्टान्त व अनुग्रह झाला. पुढे त्यांनी विकास सुरू केला. भक्तगण येथे वाढत गेले.


प.पू. भागवत बाबांनी येथे सेवा कार्य सुरू केले. परिसरात प.पू. रमणनाथः महाराजांच्या समाधीची माहिती लोकांना समजली. मोठ्या प्रमाणात भक्तगण दर्शनासाठी येवू लागले. दर्शनाने आत्मसुख मिळते, दुःख दूर होते असे अनुभव भक्तांना येवू लागले. भक्त संख्या वाढू लागली. ही माहिती तालुक्यातून जिल्हयांत पसरली. शेजारच्या अनेक जिल्हयांत माहिती गेल्याने अनेक भक्त दर्शनासाठी येवू लागले. नाशिक, पूणे जिल्हयातून भक्तगण मोठ्या प्रमाणात येथे दर्शनासाठी वाढत चालले. नाशिकहून भक्तमंडळासोबत श्री दुर्गानाथ बाबा आले होते. समाधी दर्शनाने ते प्रभावित झाले व उर्वरित आयुष्य अशाच ठिकाणी व्यतीत करावे, सेवाकार्यास समर्पित व्हावे असा मनोनिग्रह करून ते येथेच थांबले. प.पू. भागवत बाबांचे पुढील कार्य त्यांनी प्रारंभ केले. प.पू. भागवत बाबा या स्थानाचे मठाधिपती होते. प.पू. दुर्गानाथ महाराजांना प.पू. रमणनाथ महाराज यांचे आदेश, दृष्टान्त प्राप्त होत होते. ते उत्तम साधक व सन्याशी असल्याने भक्तगणांना त्यांच्या मार्गदर्शनाचे व आशिर्वादाचे लाभ व अनुभव मिळत होते.

प.पू. दुर्गानाथ महाराज अनेक वेळा गाणगापूर व अन्य तीर्थक्षेत्रात जावून त्यांची तपसाधना करीत असत. त्यांना मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग ते जनहितार्थ करीत असत. ज्ञानेश्वरीत म्हटल्याप्रमाणे "जे जे आपणाशी ठावे ते ते दुसऱ्याशी द्यावे। शहाणे करून सोडावे सकल जन।।" या प्रमाणे त्यांचे सेवा कार्य "तमसो मां ज्योतिर्गमयम्" भक्तांसाठी अखंड चालू होते. भक्तसंख्या वाढत गेल्याने त्यांची निवास अन्य व्यवस्था करणे आवश्यक होते. शिवाय समाधीस्थानाभोवती विस्तार, दत्तमंदिर उभारणे अशी अनेक कामे त्यांनी भक्तांच्या सहकार्याने सुरू करून पूर्ण केली. गरीब विद्यार्थ्यांना मोफत राहणे, जेवण व शिक्षण व्यवस्था केली. अनेक विद्यार्थी पदवीधर झाले असून पुढील शिक्षण घेत आहेत. "परोपकाराम इदं शरीरम्" या प्रमाणे अखंड आयुष्य त्यांनी जनसेवेसाठीच व्यतीत केले.

प.पू. रमणनाथ महाराज समाधी स्थळावर भक्तगण मोठ्या संख्येने वाढत चालले. त्या प्रमाणात व्यवस्थाही करणेत आली. वार्षिक कार्यक्रम ठरविणेत आले. त्यात विशेष म्हणने त्रिपुरारी पौर्णिमा प.पू. रमणनाथ महाराजांचा समाधी दिन असल्याने ३ दिवसीय जनकल्याणार्थ यज्ञ कार्यक्रम प्रारंभ केला. गुरूपौर्णिमा, दत्तजयंती उत्सव सुरू झाले. हे सर्व कार्य प.पू. दुर्गानाथ महाराजांचे मार्गदर्शनाने भक्त समुदायाचे मदतीने मोठ्या प्रमाणात सुरू झाले.

या अखंड कार्यासाठी "रमणनाथ महाराज बहुउद्देशिय संस्था" शासनमान्य करणेत आली. आज या ठिकाणी भव्य दत्तमंदिर आहे. प.पू. रमणनाथ महाराज समाधी स्थान आकर्षक सुंदर बनविले आहे. भक्त निवास, भोजनगृह, विविध छोटी मंदिरे, उत्तम पाणी व्यवस्था, आवश्यक सर्व व्यवस्था तयार करण्यात आल्या आहेत. प्रभू दत्तात्रेयांची आवडती गोमाता म्हणून येथे गोसेवा म्हणून गोशाळा सुरू केली आहे. गरीब विद्यार्थ्यांना मोफत राहणे, जेवण/शिक्षण उपक्रम चालू आहे. अत्यंत सेवाभावी कार्य संस्थेमार्फत सुरू आहे.

- मान्यवरांच्या भेटी या पवित्र तीर्थस्थळास अनेक उच्चप्रतीचे साधू, महंत, तसेच उच्च अधिकारी, मंत्री, खासदार, आमदार यांनी सदिच्छा भेटी दिल्या आहेत.
- अलोकनाथ यांची नियुक्ती प.पू. दुर्गानाथ महाराज वयोमानानुसार धकले होते. आश्रमाचा व्याप वाढला होता, पुढे हा कार्यभार सांभाळणारी त्यागमय व्यक्ती ते शोधत होते. त्यांच्या निदर्शनास अलोकनाथ व्यक्ती आली. त्यांची खात्री झाली की, हे पुढील कार्य सक्षमपणे सांभाळतील. त्यांना आपल्या कार्यात सहभागी करून घेतले. नंतर त्यांना संन्यास दिक्षा देवून सन २०१३ मध्ये माहूरगड क्षेत्रात "मठाधिपती" उपाधी दिली. पुढील कार्यभार सेवा भावनेने ४ थे मठाधिपती म्हणून सांभाळीत आहेत.





**त्यांची वैयक्तिक माहिती पुढीलप्रमाणे –**

१) श्रीदत्तउपासक अलोकनाथ महाराजांचा जन्म २५ एप्रिल १९८९ रोजी झाला.
२) ठिकाण : तानसा (भोगावती नगर) ता. शहापूर, जि. ठाणे
३) आराध्य दैवत : प्रभू दत्तात्रेय
४) वेष : नाथपंथी संन्याशी
५) विशेष : वालब्रह्मचारी व ४ थे मठाधिपती
६) स्वभाव : मायाळू, दयाळू, दुःखितांचे दुःख दूर करणेची तळमळ, समानता, तत्व अध्यात्मिकेतून सुसंस्कार घडविणेची धडपड.
७) कार्य : कर्मण्येवाधिकारस्ते (गीता तत्वाप्रमाणे कार्य)

**तीर्थक्षेत्रांना भेटी :-**

**भारतातील प्रमुख तीर्थक्षेत्रास भेटी दिल्या. अयोध्या, काशी, ज्योतिर्लिंग, गुरू दत्त स्थाने, पिठापूर, गाणगापूर, नरसोबा वाडी आणि अन्य धार्मिक स्थळे.**

- **गुरूबिन कौन बताये बाँट (संत मिराबाई) प्रमाणे ते गुरूचे महत्व सांगत आहेत.**
- **धर्मो रक्षति रक्षितः । (धर्मामुळेच रक्षण होते)**
- **विद्वान सर्वत्र पूज्यते। (विद्वान सर्वत्र पूजनीय असतो) असे सोप्या भाषेत मार्गदर्शन करतात.**





## कार्यप्रणाली

### धार्मिक व अध्यात्मिक क्षेत्रात आलोकनाथ महाराजांचे कार्य :

- **प.पु. सदगुरू रमणनाथ महाराजांचे जीवन म्हणजे एक खुले पाठ्यपुस्तक होय या संकल्पनेला धरून महाराजांनी जोपासलेला अध्यात्म मार्ग त्यांचे शिष्य नजरेसमोर ठेऊन करीत आहे.**
- **शिष्य तथा भक्त वर्गास धार्मिक शिक्षण देऊन त्यांच्याकडून अध्यात्मिक सेवा कार्य करून घेते.**
- **जनमाणसांमध्ये भक्तीची, नीती धर्माची ज्ञानज्योत तेवत ठेऊन समाज अध्यात्मिक संस्कारांनी घडवित आहे.**
- **पारमार्थिक संस्कार घडून सदगुरू ज्ञान बोधाच्या माध्यमातून लोकांचे आत्मकल्याण साधत आहे.**
- **चांगल्या निरपेक्ष वृत्तीने सेवाभावाने या जगात वावरता येते अशी शिकवणूक भक्त तथा सेवक वर्गाला देऊन समाज प्रबोधनाचे कार्य करून ट्रस्टच्या सेवाकार्यामध्ये कार्यरत असणारा सेवक वर्ग हा सेवेला आपला जीवनधर्म मानूनच कार्य करतो.**
- **समाजात अध्यात्मिक सेवाकार्य अत्यंत महत्वपूर्ण असून याद्वारे धर्म, संस्कृती व अध्यात्म यांचे जतन करण्यासाठी दत्त संप्रदायाचा प्रसार करण्यास्तव ग्रंथ, भजने, कीर्तने इत्यादी कार्याद्वारे प्रचार करून असंख्य लोकांना भक्तीचा आनंद देत आहे**
- **ध्यान धारणेद्वारे आत्म्याला शुद्धता देणे, आत्म्याची शुद्धता अनुभवणे त्याच्या सभोवतीची परिस्थिती स्वच्छ पवित्र व पुनीत करणे अर्थात जीवनविद्या,अध्यात्मिक विद्या इत्यादी ज्ञानाच्या आधारे मनुष्य आपले जीवन निश्चितच सुखी करू शकतो याची मनुष्यास जाणीव करून देत आहे.**
- **या अध्यात्मिक आणि धार्मिक कार्यामध्ये माणसाने माणसांशी माणसांसारखे वागणे, आपल्यामुळे कुठल्याही जीवाला त्रास होऊ नये, निस्वार्थ सेवाभाव ठेवणे, साधे, सोपे, सरळ, निमर्ळ असणे, दिसणे आणि वागणे तसेच केलेली पूजा, अर्चना, प्रार्थना किंवा भक्ती याप्रमाणेच आपली प्रत्येक कृती असणे इत्यादीची शिकवण देत आहे.**

## सामाजिक , शैक्षणिक क्षेत्रातील महाराजांचे योगदान -

- सर्व जाती-धर्माच्या मुलांवर अध्यात्मिक संस्कार करण्यासाठी गुरुकुल शिक्षण पद्धतीचा अवलंब करीत आहे.
- दयनीय स्थितीच्या कारणास्तव शिक्षणाचा अभाव असणाऱ्या लोकांमध्ये शिक्षणाची जाणीव करून देऊन अश्या मुलांना, शिक्षणासोबत अन्न, वस्र, निवारा, शैक्षणिक साधनसामुग्री, दैनंदिन गरजेच्या वस्तूंची सुविधा मोफत पुरविण्याचा प्रयत्न करीत आहे.
- लहान बालकांपासून प्रौढ व्यक्ती पर्यंतच्या सर्वांना ज्ञानदान देऊन त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास घडविण्याचे महान कार्य करीत आहे.
- आजची लहान मुले हि भावी जीवनात देशाच्या प्रगतीचे नागरिक आहेत या संकल्पनेला धरून मुलांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कधी कुंभाराची तर कधी माळ्याची भूमिका स्वीकारून त्यांच्या अंगी दक्षता, जागरुकता, तत्परता, दूरदर्शीपणा, नेतृत्व, योग्य -अयोग्यची पारख, आकलनक्षमता, ध्येय, वर्तन, संस्कार, शिस्त इत्यादी गुणांचा विकास करीत आहे.
- ज्ञानदानाच्या माध्यमातून समाजसेवा करीत आहे.
- सामाजिक वसा घेऊन समाजासाठी, गोर गरीब व गरजू लोकांना मोफत अन्नधान्य वाटप, पर्यावरणाविषयक जाणीव जागृती म्हणून वृक्षारोपण करणे, मोफत वैद्यकीय तपासणी करणे, रक्तदान शिबिरे असे विविध उपक्रम सातत्याने राबवित आहे.
- दुर्लब व गरीब नागरिकांसाठी गरजेच्या सुविधा पुरवित आहे.

**आलोकनाथ महाराजांच्या नेतृत्वाने सद्यस्थितीत या पावन भूमीवर प.पु.स. रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्टचे ऑफिस व आश्रम उभे आहे. या ट्रस्टचे व सर्व भक्त परिवाराचे संचालन अध्यक्ष व चौथे मठाधिपती, महंत अर्थात महान सिद्ध योगी प.पु.स. अलोकनाथजी महाराज करीत आहेत, त्यांच्याच प्रयत्नातून या स्थानावर आता गोशाळा उभी राहिली. केवळ अध्यक्ष किंवा मठाधिपती म्हणवून न घेता तेहतीस कोटी देवांचे स्थान आणि दत्तप्रभूचे गुरु म्हणून गौमातेची सेवा आलोकनाथ महाराजांच्या व्यवस्थापनाखाली केली जात आहे. तसेच केवळ पालन पोषण आणि संवर्धन हाच हेतू न ठेवता तेहतीस कोटी देवांची सेवा हा शुद्ध, निमर्ळ आणि पवित्र हेतू त्यांचा आहे.**




लेखक
श्री. भिमराज दत्तात्रय बोकंद
वाडा(पालघर)



'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Registration No. THC/256/2022-2024